महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नाशिक शहरात रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या महिलांना घरी सोडण्यासाठी सेवा सुरु करण्याबाबत

(१) ३० (२२-०३-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, पोलीस आयुक्तालय यांनी शहरात रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या महिलांना घरी सोडण्यासाठी सेवा सुरु केली असून नाशिक शहरात देखील त्याच प्रकारची सेवा सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून नाशिक शहरात देखील सदरची सेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक शहरात रात्री उशिरा प्रवास करणा-या महिलांना घरी सोडण्यासाठी नियंत्रण कक्ष येथे महिला हेल्पलाईन व निर्भया मोबाईल टोल फ्री क्र.१०९१ कार्यरत आहे. त्यावर संपर्क केल्यावर तात्काळ योग्य ती खात्री करून महिलांना घरी सुरक्षित सोडण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. याकरीता नाशिक शहरात ०४ निर्भयापथक कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील महिलेला पतीने न्यायालयाच्या स्वच्छतागृहात तलाक दिल्याबाबत

(२) १२६७ (२२-०३-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील लष्कर न्यायालयात केस सुरु असलेल्या महिलेला तिच्या पतीने पोलीसात तक्रार केल्याच्या रागातून न्यायालयाच्या स्वच्छतागृहात तलाक दिल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महिलेने लष्कर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१) होय, हे खरे आहे. परंतु सदर घटना हि लष्कर पोलीस ठाणे हद्दीतील लष्कर न्यायालयाच्या स्वच्छतागृहात घडलेली नसून ती लष्कर कोर्टाच्या शेजारील सार्वजनिक स्वच्छतागृहात घडलेली आहे.
(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून लष्कर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ४०७/२०१९ भा.द.वि. कलम ३२३, ५०४ व द मुस्लीम वुमेन (प्रोटेक्शन आफ राईट आन मॅरेज ॲक्ट २०१९ नुसार कलम ३ व ४ अन्वये आरोपीविरूध्द दिनांक ३१.१२.२०१९ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीताला दिनांक ०८.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली असून आरोपी सध्या जामीनावर मुक्त आहे. आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दर्यापूर, अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यांमध्ये तलाठी व मंडळ अधिकार कार्यालय व निवासस्थान बांधकाम करण्याबाबत

(३) १५१२ (२२-०३-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर व अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) या दोन्ही तालुक्यांतील तलाठी व मंडळ अधिकारी मुख्यालयी हजर राहत नसून जिल्ह्याच्या ठिकाणावरून ये-जा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही तालुक्यांतील मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना मुख्यालयी राहण्यासाठी कार्यालय आणि निवासस्थान नसल्याने गावकऱ्यांची गैरसोय होत असून तलाठी मंडळ अधिकाऱ्यांशी संबंधित असलेली कामे मार्गी लागत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर्यापूर व अंजनगाव सुर्जी या दोन्ही तालुक्यातील नागरिकांची आणि तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसुली कामे होण्याच्या दृष्टीने तलाठी मंडळ अधिकारी कार्यालये व निवासस्थान बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१६-०३-२०२१) : (१) दर्यापूर (जि.अमरावती) तहसिल कार्यालयांतर्गत असलेल्या एकूण-५० तलाठी व ७ मंडळ अधिकाऱ्यांपैकी मात्र ११ तलाठी हे साझा मुख्यालयी राहत नसून जिल्ह्याच्या ठिकाणाहून ये-जा करतात.

अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तहसिल कार्यालयांतर्गत असलेल्या एकूण २९ तलाठ्यांपैकी ८ तलाठी साझा मुख्यालयी तर १५ तलाठी तालुका मुख्यालयी सोयीच्या ठिकाणी राहतात. तर ५ मंडळ अधिकाऱ्यांपैकी १ मंडळ अधिकारी मुख्यालयी व ३ मंडळ अधिकारी

तालुका मुख्यालयी सोयीच्या ठिकाणी राहतात व कामाच्या ठिकाणी ये-जा करतात.

सबब, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी संबंधित तलाठ्यांना कारणे दाखवा नोटीस दिल्या असून त्यांना मुख्यालयी निवास करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) नाही.

(३) व (४) दर्यापूर व अजंनगाव सुर्जी या दोन्ही तालुक्यातील नागरीकांची आणि तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूली कामे होण्याच्या दृष्टीने दर्यापूर तालुका येथील ८ मंडळ अधिकारी व ५० तलाठी कार्यालय आणि अंजनगाव तालुका येथील ६ मंडळ अधिकारी व ३३ तलाठी कार्यालये व निवासस्थाने बांधकामाबाबतच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक मान्यतेनंतर, निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पीत आहे.

दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयाच्या इमारतींचे बांधकाम करण्याबाबत

(४) १५१७ (२२-०३-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर व अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) या दोन्ही तालुक्यातील तहसील इमारती जीर्ण झाल्या असून सद्यस्थितीतील इमारती राहण्यायोग्य नसून सदर इमारतीची दुरुस्ती परवडणारी नसल्याचे विश्वेश्वरय्या नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर या संस्थेद्वारे दिनांक २४ एप्रिल, २०१८ च्या परिरक्षण (ऑडिट) अहवालात स्पष्टपणे नमूद केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तहसीलदार, दर्यापूर यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना तहसील इमारत जीर्ण झाल्यामुळे वापरण्यायोग्य नसल्याच्या ऑडिट अहवालासह दिनांक २६ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसील कार्यालय, दर्यापूर या कार्यालयाच्या इमारतीमध्ये उपकोषागार कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, दर्यापूर ही कार्यालये असून सदर इमारतीला मोठ्या प्रमाणामध्ये तडे गेल्यामुळे पावासाच्या पाण्यामुळे संपूर्ण इमारतीचे छत गळत असल्याने शासकीय दस्तऐवज खराब होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२२-०६-२०२१) : (१), (२), (३), (४) व (५) दर्यापूर येथील तहसिल कार्यालय इमारत बांधकामाचे रु.१७,७६,५०,३००/- लक्ष निधीचे अंदाजपत्रक दि.३०/९/२०१९ रोजी शासनास प्राप्त झाले आहे. सदर अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त होऊन शासन निणेय क्र.:- बीएलडी २०१९/प्र.क्र.६६/ई-८ दि.०३ मार्च २०२१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण लोकाभिमुख करण्याबाबत

(५) १९५३ (२१-०३-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरासह अन्य काही परीसरांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला नियोजन प्राधिकरण या नात्याने नियुक्त केले असून यामुळे सदर परिसरामधील संपूर्ण विकासाची जबाबदारी एमएमआरडीएकडे येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामांबाबत निर्णय प्रक्रियेत लोकप्रतिनिधींना सामावून घेण्याची कोणतीही तरतूद प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे विकास कामांबाबत समन्वय ठेवला जात नसल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींचे योगदान व विकास कामांबाबत समन्वयासाठी एमएमआरडीएला लोकभिमुख करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०६-२०२१) : (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) अन्वये अधिसूचित क्षेत्रांच्या विकासासाठी प्राधिकरणांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. वांद्रे कुर्ला संकुल, वडाळा अधिसूचित क्षेत्र, ओशिवरा जिल्हा केंद्र, बॅकबे रिक्लमेशन स्किम, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्र इत्यादी क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकारण म्हणून उक्त अधिनियमान्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विमानतळाचे योग्य नियोजन व विकास होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच विमानतळ अधिसूचित क्षेत्रातील जमीनीचा पूरेपुर वापर होणे व त्यास संलग्न तांत्रिक वैमानिक आवश्यकता विहित पध्दतीने साध्य होण्याकरीता शासनाने दिनांक १४ मे, २००९ रोजीच्या अधिसूचनेन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास आराखडा बनविताना सर्वसाधारण नागरीकांकडून सुचना व हरकती मागविण्यात येऊन त्यावर सुनावण्या देण्यात येतात. अशा प्रकारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अधिसूचित क्षेत्रामध्ये कार्यवाही करण्यात येत असून, महत्वाच्या प्रकल्पासंदर्भातील निर्णय प्राधिकरणाच्या स्तरावर घेण्यात येतात ज्यामध्ये लोकप्रतिनिधींचादेखिल समावेश आहे.

महाराष्ट्रातील सर्व सहाय्यक संचालक नगर रचनाकार यांना भूसंपादन प्रकरणांमध्ये मूल्यांकन अभिप्राय देताना अनुसरावयाच्या मार्गदर्शक सूचनांबाबत

(६) २४१६ (०७-०४-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागाने सहाय्यक संचालक नगर रचना यांना मूल्यांकन अभिप्राय मान्य करताना नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ च्या कलम २६ ब नुसार नोंदणीकृत व्यवहारांची सरासरी काढताना नोंदणीकृत व्यवहारामधून वास्तव व अवास्तव व्यवहार ठरविण्याचे, अवास्तव किंमतीचे व्यवहार सरासरी मध्ये घेऊ नयेत याचे अधिकार सहाय्यक संचालक नगररचनाकर यांना देण्याचा शासन निर्णय परिपत्रक किंवा आदेश दिला आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक संचालक नगर रचनाकार यांनी भूसंपादन मूल्यांकन अभिप्राय देताना नवीन भूसंपादन कायद्याच्या कलम २६ नुसार सरासरी काढण्यासाठी कमीत कमी तीन व्यवहार असलेच पाहिजे आणि नोंदणीकृत तीन किंवा तीन पेक्षा कमी व्यवहार उपलब्ध असल्यास सरासरी नुसार मुल्यांकन करता येणार नाही अशा आशयाचा शासन निर्णय अथवा परिपत्रक काढण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक संचालक नगररचनाकारांनी मूल्यांकन अभिप्राय सरासरी काढण्याकरिता एकच नोंदणीकृत व्यवहार उपलब्ध असेल तर सरासरी काढता येणार नाही असा शासन निर्णय परिपत्रक किंवा आदेश पारित केला आहे काय,

(४) असल्यास, संचालक नगररचनाकार यांनी भूसंपादन मूल्यांकन प्रस्ताव मान्य करताना फक्त दोन तुलनात्मक व्यवहार असतील तर त्यापैकी पन्नास टक्के उच्च प्रतीचे व्यवहार म्हणजे एक व्यवहार मूल्यांकन किमतीसाठी स्विकारता येणार नाही असे शासन निर्णय, आदेश, परिपत्रक पारित केले आहे काय,

(५) असल्यास, अधिकार नसताना मनमानी बेकायदेशीर पद्धतीने मूल्यांकन अभिप्राय देणाऱ्या सहाय्यक संचालक नगररचनाकार, पुणे यांनी मौजे सुदवडी (ता.मावळ, जि.पुणे) येथील रस्ता भूसंपादन मूल्यांकन अभिप्राय दिनांक १ जानेवारी, २०२० मध्ये मनमानी पद्धतीने दिल्यामुळे उक्त प्रकरणी शासन त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, शासन महाराष्ट्रातील सर्व सहाय्यक संचालक नगर रचनाकार यांना भूसंपादन प्रकरणांमध्ये मूल्यांकन अभिप्राय देताना करावयाची उचित कार्यवाही याबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्यासंबंधी काय व किती दिवसात उपाययोजना करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२१) : (१) नाही.

तथापि, शासनाच्या महसुल व वन विभागाने दि.२५/०१/२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीनी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

उक्त परिपत्रकामधील नियम क्र.६ (ई) नुसार शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेवून संबंधित उपविभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी जमीनींचा मुल्यांकन

तक्ता/अहवाल तयार करुन त्यास सहायक संचालक, नगर रचना यांची मान्यता घ्यावयाची आहे.

त्यानुसार सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा कार्यालयाने त्याचे तांत्रिक अभिप्राय दि.०१/०१/२०२० रोजीच्या व त्यानंतर दि.०७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी यांना पाठविले आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार मूल्यदर निश्चित केला जातो. सदर भूसंपादन प्रस्तावामध्ये सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा कार्यालयाने उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेले तांत्रिक अभिप्राय उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसारच दिलेले आहेत.

(२) (३) (४) व (५) केंद्र शासनाच्या भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम २६-अ नुसार उपलब्ध खरेदी विक्री व्यवहारापैकी ५०% उच्चतम व्यवहारांची सरासरी काढण्याची तरतूद आहे.

प्रकरणी नमूद करण्यात येते की, सरासरी या शब्दाची व्याख्या अशी आहे की, दोन किंवा अधिक संख्याची बेरीज करुन, येणाऱ्या संख्येला एकूण संख्यांच्या क्रमांकाने भागल्यावर येणारी संख्या म्हणजे सरासरी.

सबब उपलब्ध खरेदी विक्री व्यवहार जर किमान ३ असतील, तर त्याच्या ५०% म्हणजे २ व्यवहार व त्यापेक्षा जास्त खरेदी विक्री व्यवहार उपलब्ध असल्यास त्याच्या ५०% इतके येणारे व्यवहार विचारात घेऊन त्यानुसार सरासरी दर काढणेत येतो.

सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा कार्यालयाने पुणे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिलेले तांत्रिक अभिप्राय हे उक्त्त अधिनियमाच्या कलम २६ मधील तरतूदीनुसार दिले आहेत त्यामुळे त्याच्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उध्दभवत नाही.

(६) व (७) वरील उपप्रश्न क्र.५ मध्ये नमूद केल्यानुसार सहायक संचालक नगर रचना पुणे यांनी दि.०१/०१/२०२० रोजी दिलेले मूल्यांकनाबाबत दिलेले तांत्रिक अभिप्राय हे उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार व त्यांना असलेल्या अधिकारानुसार छाननी करुन दिले आहेत.

तसेच थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याच्या जमिनीचे भूसंपादनाच्या मोबदला निश्चितीसाठीचा मूल्यदर जिल्हास्तरीय समितीने अंतिम करावयाचा आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरिय समितीची बैठक दि.०८/०९/२०२० रोजी घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये रु.१,३९,००,७१९/- प्रति हेक्टरी या दरास जिल्हाधिकारी, पुणे यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकरणी जिल्हास्तरीय समितीच्या स्तरावर कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मूल्यांकन अभिप्राय देण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्याचा किंवा उपाययोजना करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पाटस (ता.दौंड, जि.पुणे) येथे नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत

(७) ३६९५ (२३-०३-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत तसेच दौंड व यवत पोलीस स्टेशनच्या इमारती पुरेशा नसल्याने नवीन बांधकामासाठी निधी मिळण्याची मागणी लोकप्रतीनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१८ व २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनीही पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत त्यांच्या क्र.पशा-१/पाटस पो.स्टे./१९१५३/२०१८, पुणे दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१), (२) व (३) यवत (ता.दौंड,जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करून पाटस या ठिकाणी नवीन पोलीस ठाणे सुरु करण्याबाबत प्रस्तावित असून महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंध अहवालामध्ये सदर प्रस्तावाचा समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

तसेच दौंड पोलीस ठाणे व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, दौंड यांचे कार्यालयासाठी राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५, दौंड यांचे ताब्यात असलेली १५ एकर जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून पोलीस महासंचालक कार्यालयाकडे सादर करण्यात आला असून याबाबत पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

पाटस येथे सद्यस्थितीत यवत पोलीस ठाणे अंकित पाटस दूरक्षेत्र कार्यरत आहे. पाटस दूरक्षेत्र/ठाणे करिता ग्रामंपचायतीकडून २० गुंठे जागा राखीव ठेवण्यात आली असून पाटस पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यास मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(८) ४०५१ (२४-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यात एकूण १४७ पोलीस कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असताना केवळ १२१ पोलीस कर्मचारी कार्यरत असून अपुरे पोलीस कर्मचारी व वाहनांच्या कमतरतेमुळे शहरातील पोलीस प्रशासनावर कामाचा ताण आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्या व गुन्ह्यांचे प्रमाण पाहता पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे गरजेचे आहे परंतु वरिष्ठ स्तरावरून याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची २६ रिक्त पदे भरण्याबाबत तसेच आवश्यक वाहने पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (१६-०३-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही,

बार्शी तालुक्यात १) बार्शी शहर पोलीस ठाणे, २) वैराग पोलीस ठाणे, ३) पांगरी पोलीस ठाणे ४) बार्शी तालुका पोलीस ठाणे असून चारही पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची मंजूर संख्या २७६ असून कार्यरत संख्या २५४ आहे.

बार्शी तालुक्यातील ४ पोलीस ठाणे व उप विभागीय अधिकारी यांचेकरिता पाच जीप अनुज्ञेय असून, पाच जीप पुरविण्यात आलेल्या आहेत. एक अतिरिक्त जीप बार्शी विभागातील निर्भया पथकाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर ०४ पोलीस ठाण्यांसाठी ७ लाईट व्हॅन अनुज्ञेय असून, त्यापैकी ०१ लाईट व्हॅन बार्शी तालुका दरोडा प्रतिबंधक पथकास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(३) पोलीस शिपाई यांची सन २०१९ व सन २०२० च्या भरती दरम्यान रिक्त पदे भरण्याबाबत तजविज ठेवण्यात आली आहे.

राज्यामध्ये विविध पोलीस घटकांसाठी ९३५ नविन वाहने खरेदी करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामधील पंजाब नॅशनल बँकांमध्ये आपली बचत ठेवणाऱ्या नागरिकांना त्यांचे पैसे मिळत नसल्याने झालेले मृत्यू

(९) ४२७२ (११-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामधील पंजाब नॅशनल बँकांमध्ये आपली बचत ठेवणाऱ्या नागरिकांना त्यांचे पैसे मिळत नसल्यामुळे सदर तणावाने १९ लोकांचा मृत्यू झाल्याचे घटना दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-०४-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.खुजगांव (ता.शिराळा, जि.सांगली) धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत

(१०) ४३९७ (१६-०४-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खुजगांव (ता.शिराळा, जि.सांगली) येथे धरण बांधण्यासाठी तेथील ५६४ शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने (जलसंपदा विभाग) सन १९६०-७० मध्ये संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.खुजगांव येथील धरणासाठी निवडलेली जागा शासनाने रद्द करुन त्याऐवजी सदरचे धरण मौ.चांदोली येथे बांधण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौ.खुजगांव पणुंब्रे, चरण, सोनवडे, करुंगली व मराठवाडी या गावांतील धरण बांधकामासाठी संपादित केलेल्या शेकडो एकर जमिनी ५० वर्षे कालावधी होऊनही अद्याप शासनाचे (उपअभियंता, पाटबंधारे) नावे असून ७/१२ च्या उताऱ्यावर देखील शासनाचे नाव आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौ.खुजगांव येथे धरण न झाल्यामुळे त्या जमिनीच्या सातबारा व इतर हक्कात या जमिनीची खरेदी अथवा विक्री करु नये ही अट रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी वा त्यासुमारास आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक २९ जून, २०१२ रोजीच्या आदेशान्वये फक्त मौ.खुजगांव येथील निर्बंध उठविण्यात येऊन अन्य गावांचा त्यामध्ये उल्लेख नसल्याचेही दिनांक २९ डिसेंबर २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पणुंब्रे, चरण, सोनवडे, करुंगली व मराठवाडी या गावांसाठी प्रश्न भाग ४ मधील अटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०१-०४-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

वारणा कालव्यासाठी चांदोली येथील जमिनी संपादित झालेल्या असून त्या जमिनींवर उपअभियंता, वारणा डावा कालवा पाटबंधारे या नावाने ७/१२ सदरी नोंद आहे.

(४) फेरफार क्र.२८४० अन्वये ७/१२ च्या इतर हक्कात सदर जमिनीची विक्री, बिगरशेती किंवा इतर कोणतीही तबदीली अगर सुधारणा करणेची नाही, असा शेरा नोंद करण्यात आला आहे. तसेच फेरफार क्र.३८०८ अन्वये, फेरफार क्र.२८४० अन्वये दाखल केलेली शर्त (निर्बंध) कमी करण्याची नोंद घेण्यात आली आहे.

(५) पणुंब्रे, चरण, सोनवडे, करूंगली व मराठवाडी या गावांत ७/१२ च्या इतर हक्कात शेरा नोंद ठेवली नसल्यामुळे शेरे उठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यभरातील एटीएम केंद्रांतून वयोवृद्ध नागरिकांच्या बँक रक्कमेचा झालेला अपहार

(११) ४४५५ (२४-०३-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद व नाशिकसह राज्यभरातील एटीएम केंद्रांतून वयोवृद्ध नागरिकांच्या बँक खात्यातील रकमेचा अपहार करून लाखो रुपयांची फसवणूक करणा-या दोघांना ठाणे गुन्हे अन्वेषण विभाग युनिट एकच्या पथकाने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दोषींविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-०४-२०२१) : (१) होय.

सन २०२० मधील राज्यभरातील एटीएम केंद्रांतून वयोवृद्ध नागरिकांच्या बँक खात्यातील रकमेचा अपहार करणाऱ्या आरोपीची विविध जिल्ह्यातील माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	जिल्हा	बळीत व्यक्ती	अटक आरोपी	पाहिजे आरोपी	रक्कम रुपये
१	भंडारा	१	०	१	८९,०००
२	पालघर	१	०	१	५०,०००
३	बुलढाणा	२	०	१	२,४९,६१०
४	सोलापूर	१	०	१	१,३९,०००
५	हिंगोली	२	०	२	२,४५,०००
६	पुणे	२	२	०	२५,०००
७	कोल्हापूर	२	०	२	१,३०,०००
८	रायगड	१	०	१	७६,४००
९	नवी मुंबई	१	०	१	१,००,०००

उपरोक्त सर्व गुन्हे तपासावर आहेत.

ठाणे गुन्हे अन्वेषण विभाग युनिट एकच्या पथकाने फसवणूक करणाऱ्या दोघांना जानेवारी २०२० मध्ये अटक केली नसून २०१८ मध्ये अटक केली आहे. सदर बाबत

शिळडायघर पो. स्टे. येथे गु. र. नं.१८८/२०१८ भादंवि कलम ४२०,३४ प्रमाणे दिनांक १८/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल झाला आहे.

(२) पिंपरीगाव, पो.दहिसर, ता.जि.ठाणे येथील एक व्यक्ती त्यांच्या वडीलांचे एस बँक एटीएमचे पैसे काढण्यासाठी गेला असता एटीएम मधून पैसे निघत नसल्याने तेथे उभ्या असलेल्या तीन आरोपींनी गोड बोलून फिर्यादीचे एटीएम कार्ड खिशातून काढून घेतले होते, त्या एटीएम कार्डाने आरोपींनी खिडकाळी व अंबरनाथ या ठिकाणी रु.१०,०००/- रु.९,०००/- रु.५००/- व रु.४००/- असे एकूण रु.१९,९००/- एटीएम मधून काढून घेतले. यातील २ अटक आरोपींकडून रु.१७,११०/- रोख रक्कम, वेगवेगळ्या बँकेचे ५४ एटीएम कार्ड, एकूण २०,०००/ रुपये किंमतीचे ३ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यासह राज्यातील तंटामुक्त गाव समित्या कागदोपत्री असल्याबाबत

(१२) ४६७८ (२४-०३-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावागावांत तंटामुळे गाव समित्या स्थापन झाल्या असल्या तरी अनेक गावांमध्ये प्रत्यक्षात अवैध धंदे सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वाशिम जिल्हयात तंटामुक्त गाव समित्या कागदोपत्री असून अनेक गावांत अवैध धंदे व तंटे कायम आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात माहिती घेऊन या समित्या अधिक सक्रिय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२१-०५-२०२१) : (१) अमरावती-७६१, सांगली-६९९, गडचिरोली-१६८, अकोला-५३३, कोल्हापूर-१०१९, सिंधुदूर्ग-४३२, नागपूर-४७४, लातूर २९५, ठाणे ग्रामीण ३८९, नांदेड ३३६, रायगड ७०४, यवतमाळ १०४८ तंटामुक्त समित्या स्थापन असून जालना जिल्हयात तंटामुक्त गाव समिती स्थापन झालेली नाही. तंटामुक्त समितीच्या व लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करण्यात येतो व तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

रायगड, चंद्रपूर, नंदुरबार, भंडारा, परभणी, हिंगोली व नांदेड येथील तंटामुक्त समित्या स्थापन असलेल्या गावांमध्ये कोणत्याही प्रकारे अवैध धंदे सुरु नाहीत. धुळे, पालघर व सोलापूर ग्रामीण मध्ये अवैध धंदे निदर्शनास आल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात आली आहे.

रत्नागिरी येथे दारुबंदी ४७ गुन्हे, जुगार १ गुन्हा व अंमली पदार्थ कायद्याअंतर्गत १ गुन्हा दाखल करुन अवैध धंदे करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात आली आहे.

सिंधुदूर्ग येथे दारुबंदी ५५ गुन्हे व जुगार कायद्याअंतर्गत ६ गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

सातारा येथे दारुबंदी ११९७ गुन्हे व जुगार कायद्याअंतर्गत ५७० गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

ठाणे ग्रामीण मध्ये ८५५ अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली.

बुलढाणा जिल्ह्यात जुगार कायद्याअंतर्गत १७५१, दारुबंदी अंतर्गत ३६९३ गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

पुणे ग्रामीण मध्ये जुगार कायद्याअंतर्गत ५५२, दारुबंदी अंतर्गत २०५७ गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात ३२ अवैध धंदे उघडकीस आले असून सदर आरोपींवर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी कायद्याअंतर्गत ५६१८ व जुगार कायद्याअंतर्गत १४९७ गुन्हे करुन कारवाई करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यात दारुबंदी कायद्याअंतर्गत ३२२७ गुन्हे व जुगार कायद्याअंतर्गत १५२३ गुन्हे दाखल असून अनुक्रमे रु.३,२६,३१,१६५/- व रु.१,६९,७४,०४८/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

औरंगाबाद, जळगांव, नाशिक, गोंदिया व बीड जिह्यातील माहिती निरंक आहे.

(२) हे खरे नाही.

वाशिम जिल्ह्यात तंटामुक्त गाव समित्या कागदोपत्री नसून सक्रिय आहेत. वाशिम घटकात सन २०१९ व २०२० मध्ये जुगार व दारुबंदी या गुन्ह्यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वर्ष	जुगार		दारुबंदी	
	एकूण केसेस	जप्त मुद्देमाल	एकूण केसेस	जप्त मुद्देमाल
२०१९	७७१	६७३९५२४	१८२९	५२७५
२०२०	८१९	२१८४१०१	१९४४	३६३५

अवैध धंद्याबाबत गोपनीय माहिती मिळताच तात्काळ कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) तंटामुक्त न झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये मोहिमे विषयी जनजागृती करीता स्क्रिन पेंटीगचे बॅनर्स तयार करुन पोलीस स्टेशन स्तरावर वितिरित करण्यात आले आहेत. तसेच वेळोवेळी

मोहिमेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तंटामुक्ती व व्यसनमुक्ती संबंधी पथनाट्य प्रदर्शित करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील महसूल विभागातील रिक्त पदे भरणेबाबत

(१३) ४७९१ (२५-०३-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा दिनांक ०१ ऑगस्ट, २०१४ रोजी अस्तित्वात आला असून ६ वर्ष झाले असतानाही पालघर जिल्ह्यातील महसूल विभागांतर्गत मंजूर ९६६ पदांपैकी ३५३ पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे प्रशासनावर कामकाजाचा अतिरिक्त ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२३-०४-२०२०) : (१), (२) व (३)

पालघर जिल्ह्यातील महसूल विभागातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	गट	मंजूर पदे	कार्यरत पदे	रिक्त पदे
१	अ	३५	२७	८
२	ब	५१	३५	१६
३	क	५४३	३६०	१८३
४	ड	३३२	१६७	१६५
	एकूण	९६१	५८९	३७२

तसेच मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल असलेली अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ प्रलंबित असून, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार, तुर्तास पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहेत.

बिगर आदिवासी हक्क बचाव समिती, वाडा यांनी मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या क्र. ८७८३/२०१४ व ८६२९/२०१५ याचिकांमध्ये अनुसुचित क्षेत्रातील पेसा अंतर्गत येणाऱ्या १७ संवर्गामध्ये, तलाठी व कोतवाल संवर्गातील पदांचा समावेश असल्याने, त्या संवर्गातील रिक्त पदे भरता आलेली नाहीत.

पालघर जिल्ह्यातील प्रशासकीय तसेच नागरिकांचे कामकाज खोळंबू नये म्हणून रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात येवून नागरिकांची कामे पुर्ण केली जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिमा कोरेगाव (जि.पुणे) येथे झालेल्या दंगलीच्या चौकशीबाबत

(१४) ६४३७ (२७-०३-२०२०). श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा कोरेगांव येथील दंगलीची चौकशी पुणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत विशेष तपास पथक करीत असून सदर तपास प्रगती पथावर असताना केंद्र शासनाने सदर पुणे पोलीसांकडील तपास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी राज्य शासनाची घटनात्मक जबाबदारी असल्याने राज्यात घडलेल्या काही गंभीर गुन्ह्यांची चौकशी प्रथम सीआयडी व त्यानंतर विशेष पोलीस तपास पथकांकडून केली जात असून सदर यंत्रणेकडील तपास समाधानकारक नसल्यास अशी प्रकरणे राज्य शासन केंद्र शासनाच्या सीबीआय किंवा राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे पुढील सखोल चौकशीसाठी सूपूर्द करतात परंतु ही प्रथा डावलून केंद्र शासनाने परस्पर राज्य शासनाच्या संमतीविना केंद्रीय तपास यंत्रणेकडे सदर प्रकरण हस्तांतर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी राज्य शासनाने राज्याच्या महाधिवक्त्यांचा (ॲडव्होकेट जनरल) सल्ला मागीतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी राज्य शासनाच्या अधिकारावर केंद्र शासनाने अतीक्रमण केले आहे काय,

श्री.अनिल देशमुख (०१-०४-२०२१) : (१) व (२) भिमा कोरेगांव येथील दंगलीबाबतचा गुन्हा राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग केलेला नाही. तथापि, एल्गार परिषदेच्या अनुषंगाने पुणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत असलेल्या विश्रामबाग पो.स्टे. येथे दाखल गु.र.क्र. ४/२०१८ गुन्ह्याचा तपास राज्य शासनाच्या संमतीने राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग केलेला आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोबाईलवर बुकिंग घेत शरीरसुखासाठी मॉडेल पुरविणाऱ्या दोन दलालांवर कारवाई करण्याबाबत.

(१५) ६५६८ (२७-०३-२०२०). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोबाईलवर बुकिंग घेत शरीरसुखासाठी मॉडेल पुरविणाऱ्या दोन दलालांना गुन्हे शाखेने कुलाब्यातील कॅफे कॉफी डे मध्ये दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दलालांकडून अधिकची माहिती मिळाली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती जणांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२९-०६-२०२१) :(१) होय, हे खरे आहे.

गुन्हे शाखेने कुलाब्यातील कॉफी डे मध्ये सापळा रचून एक महिला दलाल हिला अटक केली असून दुसरा पाहिजे आरोपी याचा पोलीस शोध घेत आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून कुलाबा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०६/२० कलम ३७० (३), ३४ भादंविसह कलम ४, ५ पिटा ॲक्ट प्रमाणे दोन आरोपीतांविरूध्द दिनांक ०७.०१.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील एक महिला दलाल आरोपी हिला अटक केली असून दुसरा पाहिजे आरोपी याचा पोलीस शोध सुरू आहे. सदर गुन्ह्यातील महिला दलाल आरोपी हिस मा. न्यायालयाकडून जामीन मिळाला असून ती सध्या जामीनावर मुक्त आहे. तपासादरम्यान तिच्या विरुद्ध सबळ पुरावा प्राप्त झाल्याने दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदेगाव (ता.जि.जालना) शिवारात चार ते पाच जणांच्या टोळीने तरुणीचा विनयभंग केल्याबाबत

(१६) ७३१८ (२७-०३-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदेगाव (ता.जि.जालना) शिवारात चार ते पाच जणांच्या टोळीने दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका प्रेमी युगुलाला बेदम मारहाण करुन तरुणीचा विनयभंग केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोळीने या युगुलाला मारहाण करीत व्हीडीओ चित्रीकरण करुन तो व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तातडीने चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित गुन्हेगारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तालुका जालना जि. जालना येथे गु.र.नं. ३५/२०२० कलम ३५४, ३५४(अ), ३२३, ३२४, ३९५, २९४, ३४ भादवि. सह कलम ६७ माहिती व तंत्रज्ञान अधिनियम प्रमाणे दिनांक ३१.०१.२०२० रोजी एकूण ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.१ ते ४ यांना दिनांक ३१.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली असून सध्या हे चारही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.५ व ६ हे विधीसंघर्षग्रस्त बालक असल्यामुळे त्यांना ताब्यात घेवून बाल न्यायमंडळ जालना येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्यांना बाल सुधारगृह जालना येथे दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे विरूध्द दिनांक ०९.०४.२०२० रोजी वेगवेगळे दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यात वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांकडून वसूल करावयाच्या दंडाच्या रकमेबाबत

(१७) ८८१६ (२४-०७-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यात वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर ई-चलनाच्या माध्यमातून दंड लावला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या कालावधीत किती दंड आकारण्यात आला व त्यातील किती रक्कम शासन जमा झाली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (०५-०४-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२)

वर्ष	आकारण्यात आलेला एकूण दंड रुपये	वसुल करण्यात आलेला दंड रुपये
२०१८-२०१९	२२७,८३,३८,०१५	१००,०५,७७,११२
२०१९-२०२०	४९५,८४,४९,४००	१७६,९७,३२,६५०

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाधवान बंधू प्रकरणी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली नव्याने चौकशी करण्याबाबत

(१८) ११३९२ (१२-०९-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड): सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येस बँक आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी आरोपी असलेल्या व सीबीआयचे वॉन्टेड आरोपी असलेल्या वाधवान बंधू यांना गृह विभागाच्या प्रधान सचिव (विशेष) श्री.अमिताभ गुप्ता यांनी लेटरहेडवर दिलेल्या शिफारसपत्राच्या आधारे श्री. कपिल वाधवान, त्यांचे कुटुंबीय व मित्रपरिवार अशा २३ जणांनी जिल्हाबंदी असताना दिनांक ९ एप्रिल, २०२० रोजी वा त्या सुमारास लोणावळा ते महाबळेश्वर असा प्रवास केल्या प्रकरणी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव श्री.मनोज सौनिक यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीबीआय वॉन्टेड आरोपी असलेल्या आरोपीला आपण हे पत्र स्वतःच्या अधिकारात मानवतेच्या आधारावर दिले असा श्री.गुप्ता यांचा जबाब ग्राह्य मानून त्यांना ताकीद देण्याची अतिशय सौम्य शिक्षा सदर अहवालात प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी कोणता अंतिम निर्णय घेतला आहे,

(४) तसेच या प्रकरणातील उच्चपदस्थांचा अंतर्भाव विचारात घेता सत्य उघड होण्यासाठी शासन याप्रकरणी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली पुन्हा नव्याने चौकशी करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०६-२०२१) : (१) होय.
(२) व (३) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २६ एप्रिल, २०२० रोजी अहवाल सादर केला असून सदर अहवालामध्ये समज देण्याबाबत शिफारस केली आहे. समितीच्या शिफारशीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरात करोना नियंत्रण आराखड्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत

(१९) ११४२४ (१४-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाचा अहवाल होकारात्मक आणि तापासारखी लक्षणे दिसत असतानाही ठाणे शहरातील बहुतांश रुग्णांना विलगीकरण केंद्रात नेण्यात दिरंगाई करण्यात येत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत असल्याचे दिनांक २५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णाचा अहवाल होकारात्मक येऊनही त्यास तातडीने संपर्क साधणे, आवश्यकता असल्यास रुग्णालयात दाखल करणे, संपर्कात आलेल्यांची चाचणी करणे ही प्रक्रिया देखील संथगतीने होत असल्याने कोरोना नियंत्रणाच्या आराखडयाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, होकारात्मक रुग्णांच्या विलगीकरणासाठी तातडीने व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे आदेश यापूर्वी प्रशासकीय प्रमुखांमार्फत वारंवार काढण्यात आले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकाराची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार ठाणे शहरात करोना नियंत्रण आराखड्याची काटेकोर अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२४-०६-२०२१) : (१), (२), (३), (४) व (५) कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागु करण्याची अधिसूचना निर्गमित केली आहे.

उपरोक्त अधिनियमाच्या खंडानुसार महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम, २०२० अन्वये महानगरपालिकेचे आयुक्त हे साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात कोरोना उपचारासाठी १ सरकारी रुग्णालय, १८ खाजगी रुग्णालय व ६ विलगीकरण कक्ष कार्यरत होते. तसेच फिवर ओ.पी.डी. व आवश्यकता असल्यास आय.सी.एम.आर. मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून रुग्णांची चाचणी देखील करण्यात येत होती.

शासनाच्या कोविड-१९ मार्गदर्शक सूचनानुसार कोरोना चाचणी पॉझिटीव्ह आढळल्यास संबंधित रुग्णाच्या घरी वैद्यकिय अधिकारी/परिचारीका यांनी भेट देणे, रुग्णाच्या लक्षणानुसार त्वरीत त्यांना CCC, DCHC, DCH येथे भरती करणे, रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेणे, त्यांचे विलगीकरण करणे, कंन्टेनमेंट झोन राबविणे इ. सर्व उपाययोजना ठाणे महानगरपालिकेमार्फत केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

दरम्यान कोविड-१९ परिस्थिती हाताळण्याच्या अनुषंगाने विविध तक्रारी लोकप्रतिनिधींमार्फत करण्यात आल्याची वस्तुस्थिती आहे.

तथापि, कोविड-१९ विषयक शासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनाचे काटेकोरपणे पालन करुन कोरोना नियंत्रण आराखड्याची अमंलबजावणी केली जात असल्याने ठाणे महानगरपालिका क्षेत्रात रुग्ण संख्या कमी होत असल्याची व मृत्यूदर ही कमी असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रेडीरेकनरच्या दरात कपात करण्याबाबत

(२०) ११४५१ (१३-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गृहनिर्माण क्षेत्राला चालना देण्यासाठी रेडीरेकनरचे दर कमी करण्याचा निर्णय घेतला जाईल असे दिनांक २५ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांनी स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी रेडीरेकनरचा दर कमी करण्याबाबत निर्णय झाला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१९-०३-२०२१) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, १९९५ मधील तरतूदीनुसार वार्षिक मूल्य दर तक्ते प्रतिवर्षी सुधारित करुन दि.०१ एप्रिल रोजी निर्गमित केले जातात.

शिघ्रसिध्दगणकाच्या तक्रारी संदर्भात ज्या ठिकाणी अवाजवीरित्या दर जादा असतील अशा ठिकाणी सदर दराची तफावत दुरु करुन शिघ्रसिध्दगणकातील दर तर्कसंगत करण्याबाबतच्या सुचना दि.२९ जून, २०२० रोजीच्या पत्रांन्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी देण्यात आल्या होत्या.

त्यानुषंगाने, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम

१९९५ मधील तरतूदी तसेच स्थावर व्यवसाय क्षेत्रातील तरतूदी मागील वर्षात खरेदी-विक्री दरांमध्ये सरासरी वाढीचे पृथकरणात्मक विश्लेषण विचारात घेऊन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांन्वये दि.११.०९.२०२० रोजी राज्याचे शिघ्रसिध्दगणक दर प्रसिध्द केलेले आहेत.

सदर सन २०२०-२१ च्या शिघ्रसिध्दगणकातील दरांमधील मागील वाढ ही मागील शिघ्रसिध्दगणकाच्या तुलनेत सरासरी १.७४% वाढ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गुडवणवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे जमावाने तरुणांना मारहाण केल्याबाबत

(२१) ११५४४ (१३-०९-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुडवणवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतच्या बोअरवेलचा हातपंप तोडतानाचे फोटो काढून काही तरुणांनी सरपंचांना माहिती दिल्याच्या रागातून १७ लोकांच्या जमावाने या तरुणांना बेदम मारहाण केल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-०४-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

गुडवणवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील ग्रामपंचायतच्या हद्दीत घडली असून सदर बाबत कर्जत पोलीस ठाणे गु. रजि. नं.१०३/२०२० भादंवि १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १८८ म. पो. अधि.३७ (१) १३५ प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील १६ आरोपींना दिनांक ७/१२/२०२० रोजी अटक करुन मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

कोरोना विषाणू संसर्गाच्या कालावधीत घरी थांबण्याचे आदेश दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या रजा कपात करण्यात येत असल्याबाबत

(२२) ११७९० (१३-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस आयुक्तांनी ५५ वर्षे व त्यापुढील वयाच्या पोलीस कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणू संसर्गाच्या कालावधीत घरी थांबण्याचे आदेश दिनांक २८ एप्रील, २०२० रोजी वा त्या सुमारास दिले असतानाही या कालावधीतील रजा पोलीस कर्मचाऱ्यांच्या शिल्लक अर्जीत रजेतून कापण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे निवृत्तीच्या उंबरठयावर असलेल्या कर्मचाऱ्यांकडे अर्जीत रजा शिल्लक राहाणार नसल्याने रजा रोखीकरणावेळी त्यांचे ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कुर्ला पोलिस ठाणे येथील पोलीस कर्मचाऱ्याला वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांनी जबरदस्तीने कर्तव्यावर हजर राहण्यास सांगितल्यामुळे त्यांच्यासह कुटुंबातील सदस्य कोरोनाग्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (१६-०३-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही,

राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी विशेषत: ५० वर्ष वयापेक्षा जास्त याना संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये या दृष्टीने विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.) पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२८.०४.२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले असून, ५५ वर्षे वयोगटातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन ड्युटी देण्यात यावी. तसेच त्यांनी आरोग्याच्या स्थितीमुळे रजा मागीतल्यास त्यांना रजा देण्यात यावी. अन्यथा, त्यांचा जनतेशी संपर्क येणार नाही अशा ठिकाणी त्यांना नेमणूक देण्यात यावी, अशा सूचना परिपत्रकात नमूद आहे.

(३) हे खरे नाही,

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली (जि.बुलढाणा) मतदार संघाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

(२३) ११८३५ (१३-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात कापूस व मका खरेदी बाबत दिनांक ०९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चिखली (जि.बुलढाणा) येथे कोव्हीड १९ च्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाचे नियम पाळत आंदोलन करुन निवेदन बुलढाणा येथे देण्यासाठी गेले असता लोकप्रतिनीधी व कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०५-२०२१) : (१) होय.
(२) व (३) कोव्हीड-१९ च्या आलेल्या आपत्कालिन परिस्थितीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे आदेश असतानाही तसेच आंदोलन करण्यास मनाई असताना सुध्दा त्यांच्या आदेशांचे उल्लंघन करुन व विना परवानगीने बेकायदेशीर जमाव जमवून ठिय्या आंदोलन केल्याने १२ व्यक्तींवर पोलीस ठाणे बुलढाणा शहर येथे अप.क्र.५०२/२० भा.दं.वि. कलम १४३, १४९, २६९, २७०, १८८ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ कलम ५१(ब) व साथ रोग अधिनियम कलम ३ तसेच महाराष्ट्र कोविड प्रतिबंधक उपाययोजना कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा अद्याप पोलीस तपासावर प्रलंबित असून अद्याप पावेतो आरोपितांना अटक करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे गणेशवाडी (जि.हिंगोली) येथे मंडळ अधिकारी व तलाठी यांनी चुकीचा फेरफार नोंदविल्याबाबत

(२४) ११९७८ (१३-०९-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गणेशवाडी (जि.हिंगोली) येथील तहसील कार्यालय अंतर्गत एका प्रकरणात शेतजमिनीवर कुळ असल्याचा निकाल सहा वर्षापुर्वी तत्कालीन तहसिलदार यांनी दिला असताना देखील त्याच तहसील कार्यालयातील विद्यमान तहसिलदार यांनी सदर कुळ रद्द करण्याचा आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाविरुद्ध सबंधीत श्रीमती रमादेवी श्रीनाथ भट यांनी उपजिल्हाधिकारी न्यायालयात दाद मागितली असता उपजिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या नियमाने सदर आदेशाला स्थगिती देऊन पुढील कार्यवाही करण्यास मनाई केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयाची माहिती सबंधीत तहसिल कार्यालयाला त्याच दिवशी कळविली असून देखील दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सबंधीत मंडळ अधिकारी व तलाठी यांनी संगनमत करुन सदर फेरफार चुकीचा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणातील सबंधीत कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्याच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०२-०३-२०२१) : (१) (२) व (३) होय. मौ.गणेशवाडी, ता.जि.हिंगोली येथील शेत स.नं.१६/१ या शेतजमिनीवर कुळ असल्याचा निर्णय तहसिलदार हिंगोली यांनी दि.१३.०४.२०१२ रोजी दिला होता. त्यानंतर प्रकरणात वेळोवेळी वरिष्ठ कुळ न्यायालयात अपील दाखल होऊन शेवटी मा.महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे श्री.चंद्रकांत काशिनाथ निलावार व इतर यांनी दाखल केलेल्या पुनर्रिक्षण अर्जावर, मा.महसूल न्यायाधिकरणाने दि.२९.०१.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, तहसिलदार यांनी श्रीमती रमादेवी श्रीनाथ भट व इतर यांचे कुळ असल्याचा दिलेला दि.१३.०४.२०१२ रोजीचा निर्णय रद्द करून प्रकरण फेरचौकशी करिता तहसिल कार्यालयाकडे वर्ग केले होते. त्यावर तहसिलदार हिंगोली यांनी रितदर संविधानिक स्वरूपाची चौकशी करून दि.२९.०८.२०१९ रोजी कुळ रद्द करण्याचा निर्णय दिला आहे. सदर निर्णयाच्या नाराजीने श्रीमती रमादेवी श्रीनाथ भट व इतर यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयात दाद मागितली. याअनुषंगाने उपजिल्हाधिकारी कार्यालयाने दि.१४.११.२०१९ च्या आदेशान्वये सदर प्रकरणी स्थगिती दिली आहे. तरी देखील तहसिल कार्यालय हिंगोली यांनी दि.२९.०८.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून संबंधित तलाठी सज्जा कारवाडी यांनी दि.०७.१०.२०१९ रोजी फेरफार घेऊन, मंडळ अधिकारी बासंबा, ता.हिंगोली यांनी सदर नोंद दि.१५.११.२०१९ रोजी प्रमाणित केली आहे.

(४) सदर प्रकरणी संबंधित तलाठी, सज्जा कारवाडी व मंडळ अधिकारी, बासंबा ता.हिंगोली यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू असल्याबाबत जिल्हाधिकारी हिंगोली यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील प्लॉट अपहार प्रकरणी चौकशी करणेबाबत

(२५) १२०५३ (१३-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तहसिल कार्यालयांतर्गत शेकडो प्लॉटची परस्पर विक्री करुन फेरफार करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही प्लॉटचे खरेदी विक्री किंवा फेरफारचे नोंदीचे अधिकार केवळ तलाठी यांनाच आहे काय तसेच या प्रकारे तलाठी मुळ मालकाचे नांव बदलवून किंवा फेरफार करुन प्लॉट तसेच लेआऊट गैरव्यवहार करु शकतो काय,

(३) असल्यास, शेकडो प्लॉटबाबत गैरव्यवहार केलेला असतांना केवळ एका तलाठयावरच तपास येऊन थांबला आहे, हे ही खर आहे काय,

(४) असल्यास, हया संपुर्ण प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्यात येऊन दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१८-०३-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

(२) कोणत्याही मालमत्तेचे खरेदी-विक्री चे व्यवहार नोंदविण्याचे अधिकार दुय्यम निबंधक कार्यालयास आहेत.

खरेदी दस्तान्वये तलाठी अभिलेखामध्ये फेरफार घेण्याचे अधिकार तलाठी यांना आहेत. व सदर फेरफारावर निर्णय घेण्याचे अधिकार मंडळ अधिकारी यांना आहेत. परंतु तलाठी यांच्या ताब्यातील अभिलेखांमध्ये कोणत्याही प्रकारची अनधिकृत नोंद घेण्याचे अधिकार तलाठी यांना नाहीत. जर तलाठी यांनी अशी कृती केल्यास ती बेकायदेशीर व दंडनीय आहे.

(३) नाही.

(४) तहसिलदार खामगाव यांनी त्यांच्या दि.१३.१२.२०१९ च्या आदेशान्वये, प्रस्तुत प्रकरणातील गैरप्रकार / अनियमिततेबाबत सखोल चौकशीकरता नायब तहसिलदार (निवडणूक) यांच्या प्रमुखतेखाली नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल आणि महसुल व वन विभागाच्या दि. ०४ जुलै २०१९ नुसार ई-फेरफार प्रणाली मध्ये महसुल अधिकारी / कर्मचारी यांच्या निश्चित केलेल्या जबाबदा-या लक्षात घेता तत्कालीन तलाठी यांच्यावर भा.दं.वि.कलम ४०९, ४२०, ४६८, ४७१ खाली अप क्र.११ दि.०८.०१.२०२० अन्वये पोलीस स्टेशन खामगाव शहर येथे गुन्हा दाखल केला आहे. सद्य:स्थितीत ते तुरुंगात असून पुढील तपास पोलीस विभागामार्फत चालू आहे.

तसेच चौकशी समितीने सादर केलेला अंतिम अहवाल लक्षात घेता जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सदर गैरप्रकारास जबाबदार तलाठी यांचे विरूध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे.

तसेच पर्यवेक्षणात कसुर केल्याबाबत मंडळ अधिकारी, खामगाव यांची विभागीय चौकशी करण्यात येवून त्यांच्याविरूध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ५ (१) खाली, त्यांना देय असणारी एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षा करीता रोखण्याची शिक्षा बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठातील रोजंदारी व प्रकल्पग्रस्त मजुरांच्या समस्येबाबत

(२६) १२१४९ (१४-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रोजंदारी व प्रकल्पग्रस्त मजुर मागील अनेक वर्षे डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामध्ये रोजंदारी व ठेका पध्दतीने कार्यरत असुन विद्यापीठाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावुन घेण्याबाबत डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली व श्रमिक कामगार संघटना, दापोली यांनी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, दापोली तालुक्यातील उक्त कर्मचाऱ्यांना विद्यापिठाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२५-०६-२०२१) : (१) होय.
(२) होय.
(३) राज्यात हंगामी पदे निर्माण करू नयेत व ती भरण्यात येवु नयेत, हंगामी स्वरुपाची कामे ज्या विभागांमध्ये केली जातात ती यापुढे कंत्राटी पद्धतीने करून घेण्यात यावीत, असे वित्त विभाग शासन निर्णय दि.१०.०९.२००१ अन्वये निदेश आहेत.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील रोजंदारी मजूरांना कायम आस्थापनेवर सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला होता. सदर रोजंदारी मजुरांना सामावुन घेण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरालगतच्या हडपसर आणि तत्सम उपनगरातील मालमत्ताधारकांना मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड) देण्याबाबत

(२७) १२४१४ (१३-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरालगतच्या हडपसर आणि तत्सम उपनगरांतील मालमत्ताधारकांना ७/१२ उतारा ऐवजी मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड) देण्याची कार्यपद्धती अवलंबण्यास शासनाने सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७/१२ उतारा ऐवजी मालमत्तापत्रक देण्याची पद्धत कधीपासून सुरु करण्यात आली आहे तसेच हयासंबंधीचे रेकॉर्ड अद्ययावत करण्याचे काम अतिशय मंदगतीने सुरु असल्यामुळे नागरिकांना मालमत्ता उतारे मिळण्यामध्ये विलंब होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३० जून, २०२० अखेरपर्यंत रेकॉर्ड अद्ययावत करण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे आणि ही कार्यवाही पूर्ण होऊन ऑनलाईन ७/१२ उताराप्रमाणेच ऑनलाईन मालमत्ता पत्रके सुरळीतपणे मिळण्यासाठी सुमारे किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०५-०३-२०२१) : (१), (२), (३) व (४) गावठाणांचे क्षेत्रातील बिनशेती उपयोगी वापराच्या जमिनी ज्यांचा नागरी भूमापनात समावेश होतो, अशा क्षेत्रामध्ये मालमत्ता धारकांचे मालकी हक्काची नोंद करण्याच्या दुहेरी पध्दत गा.न.नं. ७/१२ बंद करण्याची

कार्यवाही शासनाच्या दिनांक २७.१२.१९९० च्या परिपत्रकानुसार करण्यात येते.

त्यानुसार हडपसर, लोहगाव, बिबवेवाडी, गुलटेकडी, मुंजेरी, येरवडा, घोरपडी, धानोरी, मुंढवा, कात्रज, वानवडी, कळस, कोढंवा खुर्द या १३ गावामध्ये नगर भूमापन हद्दीतील एकूण १०६८ बिनशेती झालेले सर्व्हेनंबर/गट नंबर असून त्यापैकी एकूण ८१४ सर्व्हेनंबरचे गा.न.नं. ७/१२ बंद करण्यात येवून, ८१४ सर्वेनंबर पैकी ६७९ सर्व्हे नंबरचे मालमत्ता पत्रक तयार करण्यात आलेले असून, उर्वरीत १३५ सर्वे नंबरचे मालमत्तापत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच १०६८ बिनशेती झालेले सर्व्हेनंबर/गट नंबर पैकी शिल्लक २५४ सर्व्हे नंबर/गट नंबरचे गा.न.नं. ७/१२ बंद करून मालमत्तापत्रक (प्रॉपर्टी कार्ड) तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

त्याचप्रमाणे NIC पुणे यांच्या तांत्रिक सहकार्याने ePCIS ही संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम प्रगतीत असून मिळकत पत्रिकेचा संगणकीकृत डाटा रिस्टक्चरिंग व अद्यावती करणाची कार्यवाही प्रगतीत आहे. सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर गा.न.नं.७/१२ प्रमाणे ऑनलाईन मालमत्ता पत्रके पूरविण्यात येणार आहेत. पुणे उपनगरातील सर्व मिळकत पत्रिकांची अधिकृत माहिती "महाभूमी" या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

पुणे येथील विमाननगर परिसरातील संजय पार्क सोसायटीतील एका घरातून बनावट नोटा जप्त केल्याबाबत

(२८) १२५७१ (१३-०९-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील विमाननगर परिसरातील संजय पार्क सोसायटीतील एका घरात लष्कराची गुप्तचर यंत्रणा आणि पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखेच्या पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात ४३ कोटीहून अधिक भारतीय नोटा तर चार कोटी रुपयांच्या परदेशी बनावट नोटा जप्त करुन ६ जणांना अटक केल्याचे दिनांक १० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात लष्करातील जवान सुत्रधार असल्याने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अनिल देशमुख (०१-०४-२०२१) : (१) लष्कराची गुप्तचर यंत्रणा आणि पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखेच्या पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात चिल्ड्रेन बँक ऑफ इंडीयाच्या नोटा मिळून आल्या आहेत.

(२) व (३) होय, चौकशी करण्यात आली आहे.

चिल्ड्रेन बँक ऑफ इंडीयाच्या नोटांचा उपयोग स्वत:कडे पैसे आहेत असे दाखविण्यासाठी करुन व्हिडीओ पाठवून किशोर पांडुरंग पडाळ, पुणे यांची १०,००,०००/- रुपयांनी तसेच किरण संजय सोनवणे, गागरगाव, जि.पुणे यांची २०,०००/- रुपयांनी फसवणूक केल्या प्रकरणी सुत्रधार लष्करी जवान शेख अलीम समद गुलाब खान, प्रतिकनगर, येरवडा-पुणे हा व त्याचे इतर ५ साथीदार विरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन येथे गु. र. नं.४७४/२०२० भादंवि कलम ४८९/AX BX (C) ४२०, १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी विद्यापीठांमधील प्राध्यपकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२९) १२७५९ (१४-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची रिक्त पदे भरली नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंधरा कृषी विद्यापीठांमधील एकूण ६९१ प्राध्यापकांची पदे भरण्यास शासनाने परवानगी देऊनही सामान्य प्रशासन विभागाने रोस्टर संबंधी काढलेल्या एका आदेशामुळे ही भरती प्रक्रिया बंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाने काढलेले रोस्टरचा जीआर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) तसेच, कृषी विद्यापीठांमधील रिक्त प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२५-०६-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यांमध्ये एकूण ४ कृषि विद्यापीठे कार्यरत आहेत. चारही कृषि विद्यापीठांमध्ये एकूण ९७६ प्राध्यपकांची पदे रिक्त असुन शासन निर्णय क्रमांक- बीसीसी २०१६/प्रक्र २२८ अ/१८/१६ब दि. २२ ऑगस्ट, २०१९ नुसार छोटया सवंर्गातील पदांसाठीची बिंदुनामवली अद्यावत करण्यास अडचणी उद्भवत आहे तसेच शासन निर्णय क्र.अर्थस २०२०/प्रक्र ६५/अर्थ-३, दि.४ मे, २०२० नुसार सरळसेवेची सर्व पदभरती प्रक्रिया स्थगिती करण्यात आलेली आहे.

(३) सदर शासन निर्णयास दिलेली स्थगिती अद्याप कायम आहे.

(४) शासन निर्णय क्र.अर्थस २०२०/प्रक्र ६५/अर्थ ३,दि.४ मे,२०२० नुसार सरळसेवेची पदभरती प्रक्रिया स्थगिती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील नागरिकांना पीआर कार्ड देण्याबाबत

(३०) १२८०४ (१३-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिका हद्दीत शेकडो गुंठेवारी वसाहती असून येथील नागरिक गेल्या पस्तीस ते चाळीस वर्षांपासून येथे वास्तव्यास असताना सदर नागरिकांना मालकी हक्काचा पुरावा असणारे पीआर कार्ड अद्यापही मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीमधील नागरिकांकडे मालकी हक्काचा पुरावा असणारे पीआर कार्ड नसल्यामुळे बँका कर्ज देत नसल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून औरंगाबाद शहरातील लाखो नागरिकांना पीआर कार्ड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१८-०३-२०२१) :(१), (२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १२२ अन्वये औरंगाबाद शहराच्या नगर भूमापन हद्दीमध्ये समाविष्ट असलेले सर्व्हे नंबर मधील गुंठेवारी कायद्यांतर्गत संबंधीत भूखंडाचे नियमानुकुलन करण्याचे आदेश निर्गमित करण्याचे अधिकार औरंगाबाद महानगरपालिकेस आहेत. सदर आदेश पारीत झाल्यानंतर संबंधीत भूखंडावर अकृषीक आकारणी निश्चित करण्याचे अधिकार महसूल विभागास आहे. परंतु, भूखंडाचे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमानुकुलन करण्याचा प्रस्ताव नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झालेले नाहीत. गुंठेवारी कायद्यांतर्गत संबंधीत भूखंडाचे नियमानुकुलन व त्या बाबत अकृषीक आदेश व सदर भूखंडावर अकृषीक आकारणी सह अर्ज नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४९ अन्वये नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांची रिक्त् पदे भरण्याबाबत.

(३१) १३०३२ (१३-०९-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिदुर्गम व नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांच्या १,५१४ मंजुर पदांपैकी ६१४ पदे रिक्त् असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-०६-२०२१) : (१) व (२) गडचिरोली जिल्हयात पोलीस पाटील यांची एकूण १५१४ पदे मंजूर आहेत. सद्यस्थितीत, ८४२ कार्यरत असून ६७२ पदे रिक्त आहेत.

गडचिरोली जिल्हयात एटापल्ली उपविभाग व गडचिरोली उपविभाग यामध्ये रिक्त पदाची संख्या लक्षणीय आहे. संवेदनशील नक्षलग्रस्त भागात उमेदवारांचा पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे व पात्र उमेदवार उपलब्ध न होऊ शकल्याने सदर पदे रिक्त आहेत.

सद्यस्थितीत, कोविड-१९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे पोलीस पाटील पदभरतीस प्रतिबंध आहे. सदर प्रतिबंध शिथिल होताच सदर रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ऑनलाइन पद्धतीने मिळणाऱ्या ७-१२ उता-यावर कुळ व इतर हक्क नोंद होणेबाबत

(३२) १३२७८ (१३-०९-२०२०). श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमीन कसणा-या शेतक-यांची नावे अनेक वर्षापासून हस्तलिखित ७-१२ उता-यावर कुळ व इतर हक्क म्हणून नोंद होती परंतु सद्यस्थितीत शासनाने ७-१२ उतारा ऑनलाइन केला असुन या उता-यावर कुळ नोंद असलेली माहिती येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शेतक-यांना मुळ शेत मालकाकडून कोणत्याही प्रकारे विचारात न घेता त्यांचेकडून परस्पर शेत जमीन विकली जात असल्याने अशा शेतक-यांवर अन्याय होत असल्याने त्यांचे फार मोठे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब विचारात घेऊन ऑनलाइन ७-१२ उता-यावर पिकपाण्याला कुळ व इतर हक्क नोंद होणेसाठी कॉलम क्रमांक १५ जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०५-०३-२०२१) : (१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार (अभिलेख नोंदवहया तयार करणे व अद्यावत ठेवणे) नियम, १९७१ अस्तित्वात आले. तेव्हा पासून सदर नियमान्वये विहीत केलेला गा.न.नं.७/१२ लागू करण्यात आला आहे. या नियमान्वये विहीत केलेल्या गा.न.नं.७/१२ प्रमाणे संगणकीकृत गा.न.नं.७/१२ तयार करण्यात आला असून, त्यामध्ये कायदेशीर कुळांची व इतर हक्कदारांची नांवे गा.न.नं.७/१२ चे इतर हक्कात नोंद केली जातात.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार (अभिलेख नोंदवहया तयार करणे व अद्यावत ठेवणे) नियम, १९७१ नियमान्वये विहीत केलेल्या गा.न.नं.७/१२ प्रमाणे संगणकीकृत गा.न.नं.७/१२

तयार करण्यात आला आहे. त्यामुळे संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मध्ये बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात मौजे कार्वे येथे नवीन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत

(३३) १३३६५ (१३-०९-२०२०). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुका हा कर्नाटक व गोवा राज्यांच्या सीमेवरील दुर्गम व डोंगराळ तालुका असून ह्या तालुक्यामध्ये एकच पोलीस स्टेशन असून तालुक्याचा विस्तार तसेच लगतच्या कर्नाटक व गोवा राज्यातून उदभवणाऱ्या अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी दुसऱ्या पोलीस स्टेशनची आवशक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्याची सन २००९-२०१० या कालावधीत लोकसंख्या गृहीत धरून पदे मंजूर करण्यात आली होती परंतु सद्यस्थितीत लोखसंख्येच्या अनुषंगाने जादा पदे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे कार्वे येथे पोलीस विभागाच्या मालकीची जागा उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी शासन तालुक्यासाठी दुसरे पोलीस स्टेशन मंजूर करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१) व (२) चंदगड तालुका भौगोलिकदृष्टया मोठा असून सध्या तालुक्यासाठी चंदगड पोलीस ठाणे हे एकच पोलीस ठाणे कार्यरत आहे. चंदगड तालुक्याचा विस्तार, वाढती लोकसंख्या व वाढत्या नागरी वस्तीचा विचार करता नवीन पोलीस स्टेशनची आवश्यकता आहे. तथापि गृह विभाग,शासन निर्णय दि.२३.०१.१९६० मधील मापदंडानुसार सध्याच्या चंदगड पोलीस ठाणेचे विभाजन करून नवीन पोलीस ठाणे निर्माण करणे प्रशासकीयदृष्टया शक्य नाही. सदर बाब विचारात घेता मौजे कार्वे येथे दूरक्षेत्र निर्मितीचा व सदर दूरक्षेत्र निर्माण करण्याकरिता आवश्यक नवीन ३६ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक,,कोल्हापूर यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला आहे. तसेच चंदगड पोलीस ठाण्याकरिता अतिरिक्त ३३ अधिकारी/कर्मचारी पदांची आवश्यकता असलेल्या प्रस्तावाचा महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या सुधारित आकृतीबंध अहवालामध्ये समावेश करण्यात आला आहे. वित्त विभाग,शासन निर्णय दि.०२.०६.२०१५ व दि.०४.०५.२०२० अन्वये नवीन पदनिर्मितीवर निर्बंध आहेत. सदर निर्बंध शिथिल झाल्यानंतर वित्त विभागाच्या सूचनेनुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) मौजे कार्वे,ता.चंदगड येथील भूमापन क्रंमाक २३८ मधील ०-१८ आर इतकी जागा पोलीस विभागाच्या मालकीची जागा उपलब्ध आहे. प्रस्तावित मौजे कार्वे,ता.चंदगड दूरक्षेत्रास मान्यता मिळाल्यानंतर सदर जागेवर दूरक्षेत्रास बांधकाम प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

माण (जि.सातारा) तहसील कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३४) १३४४८ (१३-०९-२०२०). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण (जि.सातारा) तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार, क्लार्क, तलाठी इत्यादी पदे रिक्त असल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा अधिक ताण येत असून पदे रिक्त असल्यामुळे पंतप्रधान किसान मानधन योजना, ७/१२ संगणीकरण यासारख्या अनेक योजना व नागरिकांची दैनंदिन कामे रखडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माण तहसील कार्यलयात सध्या नायब तहसीलदारांची चार पदे मंजूर असून दोन पदे रिक्त आहेत तसेच संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार पद रिक्त आहे व तलाठी यांची ४२ पदे मंजूर असून केवळ ३२ तलाठी कार्यरत असून लिपिकाच्या १६ पदांपैकी ८ पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०६-२०२१) : (१) (२) (३) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत तहसिल कार्यालय दहिवडी येथील अधिकारी कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असली तरी देखील कार्यरत कर्मचारी यांचेकडून काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

राज्यातील नायब तहसिलदार संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण ७३ पदे राज्यसेवा परिक्षा-२०२० द्वारे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच पुणे विभागातील नायब तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

सातारा जिल्हयातील लिपीक संवर्गातील रिक्त पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भरण्यात येत आहेत.

सातारा जिल्हयातील तलाठी संवर्गातील एकूण ११४ रिक्त पदांपैकी ३६ उमेदवारांचे नियतन करण्यात येऊन त्यांना संबंधित उपविभागीय अधिका-यांकडून नियुक्तीही देण्यात आली आहे. उर्वरीत उमेदवारांचे नियतन/नियुक्तीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील हिल रोड, वांद्रे येथील सी.टी.एस. क्र.७५४ या भूखंडावरील खेळाच्या मैदानाचे असलेले आरक्षण चुकीच्या पद्धतीने रद्द केल्याबाबत

(३५) १३६६९ (२०-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील (हिल रोड, वांद्रे) येथील सी.टी.एस. क्र. ७५४ या भूखंडावरील 'खेळाच्या मैदानाचे' असलेले आरक्षण मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी विकासकाशी संगनमत करून विकासकाचा फायदा करण्याच्या हेतूने चुकीच्या पद्धतीने रद्द केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुषंगाने विकासकाच्या फायद्यासाठी अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या संबधित अधिकारी, कर्मचारी आणि विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२१) : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास योजना-१९९१ मधील एच/पश्चिम विभागातील सी.टी.एस. क्र. ७५४ वांद्रे 'अ' हा भूखंड खेळाचे मैदान करीता आरक्षित होता. या जागेच्या जमिनमालकांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ च्या तरतुदीनुसार सुचना दिली असता महानगरपालिकेने सदरची जागा विहीत कालावधीमध्ये खरेदी केली नाही. त्यामुळे सदरचे आरक्षण व्यपगत झाल्याचे शासनाने महानगरपालिकेला कळविले होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुधारीत विकास योजना-२०३४ मध्ये सदर जागेवर पुन्हा वाहनतळाचे आरक्षण प्रस्तावित केले होते. परंतु सदर जागेवरील आरक्षण वगळून तेथे लगतचा झोन प्रस्तावित करण्याचे शासनाने पुनर्प्रसिध्द विकास योजनेमध्ये ई.पी. एच.डब्ल्यु-१८ अन्वये दर्शविलेला आहे. त्यास अद्याप शासनाने मंजुरी दिलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उंब्रज (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश नाकारल्याने भाजीपाला विक्री करणाऱ्या एका दाम्पत्याने विष प्राषन केल्याबाबत

(३६) १३७५७ (१३-०९-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंब्रज (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश नाकारल्याने भाजीपाला विक्री करणाऱ्या एका दाम्पत्याने विष प्राषन केल्याचे दिनांक ६ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेत पत्नीचा मृत्यू झाला असून पती अत्यावस्थ असल्याचे तसेच तपासणी नाक्यावर आई-वडिलांना मारहाण करून अपमानास्पद वागणूक दिल्यानेच त्यांनी हे पाऊल उचलल्याबाबत तक्रार त्यांच्या मुलाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची अतिरिक्त पोलिस अधीक्षकांमार्फत चौकशी करण्याचे आदेश पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक यांनी दिले असून त्याप्रमाणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिलीप वळसे-पाटील (३१-०५-२०२१) : (१) सदरची घटना ही दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी घडली आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीसांनी मयत महिला व तिच्या पतीस कोणत्याही प्रकारची मारहाण केली नसून त्यांना अपमानास्पद वागणूक दिली नाही. उंब्रज नं.१ या ठिकाणी कोवीड-१९ या संसर्गाचे लोक पॉझीटीव्ह सापडल्याने ते प्रतिबंधित क्षेत्र घोषीत करण्यात आलेले होते. उंब्रज नं.१, ता.जुन्नर, जि.पुणे येथील शिंगोटे दाप्मत्यास प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश नाकारण्यात आला नव्हता. सदर गावातील मुख्य रस्त्यावर जाण्यायेण्यास लोकांना प्रतिबंधित केला होता. सदर घटनेची पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी चौकशी केलेली आहे. याबाबत प्रत्यक्ष साक्षिदार यांच्याकडे चौकशी करण्यात आली असता सदर घटनेच्या अनुषंगाने शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याबाबत ओतूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं.४२८/२०२० भादंवि क. ४५२, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे कायदेशीर कर्तव्य बजाविले असून त्यामध्ये कोणतेही कर्मचारी दोषी आढळून आले नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

अकोला जिल्हयातील मुगाच्या पिकांवर लिफ क्रिंकल या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

(३७) १४३५० (१४-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात खरीप हंगामामधील सन २०२० या कालावधीत मुगाच्या पिकांवर लिफ क्रिंकल या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कृषी खात्याकडून सर्वेक्षण व नुकसानीबाबत अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अकोला जिल्हयात किती हेक्टर मुग पिकांचे नुकसान झाले आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अकोला जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (१८-०६-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

(३) सर्वेक्षणानुसार ३०,५६५ हे. क्षेत्रावरील मुग पिकाचे नुकसान झाले आहे.

(४) महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दि.९/११/२०२० व दि.७/०१/२०२१ अन्वये निधी उपलब्ध करून देण्यात आला असुन मदत वाटपाची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील कासा भागामध्ये आदिवासींच्या जमिनीवर शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी केलेले अतिक्रमण

(३८) १४३७० (१५-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कासा भागामध्ये आदिवासींच्या जमिनीवर शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी अतिक्रमण केल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आदिवासी असलेल्या जागेच्या मालकाने याबाबत तक्रार करुनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०६-०४-२०२१) : (१), (२) व (३) श्रीम.काशी गणपत गोवारी व इतर आदिवासी खातेदार यांचे मालकीचे मौजे कासा, ता.डहाणू, जि.पालघर येथील स.नं.४९ मध्ये पुज्य आचार्य भिसे विद्यालय या संस्थेचे कर्मचारी श्री.हरेश शिवराम मुकणे यांनी अनधिकृतपणे बांधकाम केले असल्याबाबत दिनांक २४.०६.२०२० च्या पत्रान्वये तहसिलदार, डहाणू यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. तहसिलदार डहाणू यांनी दिनांक ०७.०७.२०२० च्या पत्रान्वये बांधकाम बंद ठेवण्याबाबत सूचना दिल्या असून आजमितीस बांधकाम बंद आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.दिवाणी न्यायालय, डहाणू येथे कब्जा व निरंतर मनाई आदेशाच्या अनुषंगाने रे.मु.नं.३०/२०१८ दाखल असून कोर्ट कमिशन नेमून दिनांक ०३.०८.२०२० रोजी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, डहाणू यांचेमार्फत जमिनीची मोजणी करण्यात आली आहे. सदर मोजणीचा अहवाल मा.दिवाणी न्यायालयात सादर करण्यात आला आहे. मा.दिवाणी न्यायालय, डहाणू यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलीस पाटील व कोतवाल यांना विम्याचे संरक्षण न दिल्याबाबत

(३९) १४४११ (१३-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटील व कोतवाल हे जीव धोक्यात घालून कोरोना विषाणू विरोधात काम करत असतांना त्यांना विम्याचे संरक्षण दिले नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस पाटील व कोतवाल यांना विमा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०१-०६-२०२१) : (१) व (२) कोव्हिड-१९ संबंधित सार्वत्रिक साथीमध्ये कोविड विषयक कर्तव्यावरील (सर्वेक्षण, शोध मार्ग काढणे, प्रतिबंध , चाचणी, उपचार व मदत कार्य इत्यादीबाबत) कर्मचाऱ्यांच्या मृत्यूच्या सर्व प्रकरणी रु.५० लाख रकमेचे सानुग्रह सहाय्य धोरण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दि.२९.०५.२०२० व दि. १४.१०.२०२० अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

सदर धोरणामध्ये कंत्राटी / बाह्य स्त्रोतांद्वारे घेतलेले / रोजंदारी / तदर्थ / मानसेवी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पोलीस पाटील व कोतवाल ही पदे मानसेवी सेवांमधील आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सेवानिवृत्त पोलीसांना ७ व्या वेतन आयोगाच्या लाभासह पेन्शन व इतर लाभ न मिळाल्याबाबत

(४०) १४४५५ (१३-०९-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवानिवृत्त पोलिसांना ७ व्या वेतन आयोगाच्या लाभासह पेन्शन व इतर देय असलेले लाभ अद्यापपर्यंत मिळाले नसून तात्पुरत्या स्वरुपाची पेन्शन देखील मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०५-२०२१) : (१) व (२) राज्यातील सर्व सेवानिवृत्त पोलिस अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या लाभांसह पेन्शन व इतर लाभ देण्यात येत आहेत. वेतन पडताळणी अभावी काही सेवानिवृत्त पोलिस अधिकारी/कर्मचारी यांना सदर लाभ देण्यास विलंब झाला असला तरी अशा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर लाभ देण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तराळा (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) येथील शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत फळबाग लागवडीस अनुदान मिळण्याबाबत

(४१) १४८५८ (२६-१०-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तराळा (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) येथील शेतकऱ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत फळबाग लागवडीस अनुदान मिळणेबाबत कृषी सहाय्यक यांना

मागणी केली असता शासनाचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे सांगून फळबागांचे अर्ज न घेतल्याने अखेर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, वाशिम यांना दिनांक २८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेटून फळबाग योजनेला वाढीव मंजुरी देऊन शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अथवा भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेतंर्गत शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी अनुदान मंजूर करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांना फळबाग लागवडीस अनुदान करण्यासह शेतकऱ्यांचे अर्ज स्वीकारण्यास दिरंगाई करणाऱ्या कृषी सहायकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (११-०५-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेंतर्गत शेतक-यांना फळबाग लागवडीसाठी सन २०२०-२१ मध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. ४०.०० कोटी व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु. १.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(३) तालुका कृषी अधिकारी, मंगरुळपीर यांनी या प्रकरणी चौकशी केली असता, दिरंगाई झाली नसल्याचे आढळल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बोरखेडा (ता.रावेर, जि.जळगाव) येथे चार अल्पवयीन भावंडांची हत्या केल्याबाबत

(४२) १६५७४ (२७-११-२०२०). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरखेडा (ता.रावेर, जि.जळगाव) येथील एका शेतातील घरामध्ये एकाच कुटुंबातील चार अल्पवयीन भावंडांची (दोन मुले व दोन मुली) अमानुषपणे हत्या केल्याची घटना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हत्या झालेल्या भावंडांमध्ये एका अल्पवयीन लहान मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार या हत्याकांडातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे काय तसेच दोषींविरुद्ध कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (०१-०४-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी रावेर पोलीस स्टेशन येथे भाग- ५ गु.र.नं. १८८/२०२० भा.दं.वि.स. कलम ३०२, ३७६(अ), ४५२, २०१ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा सन २०१२ चे कलम ४,६,८,१०,१२ प्रमाणे दिनांक १६.१०.२०२० रोजी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीतास अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाकडुन आरोपीस दिनांक २३.१०.२०२० पासून दि. ३१.१०.२०२० रोजी पावेतो पोलीस कस्टडी मिळाली आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील आरोपीविरूध्द दिनांक १२.१२.२०२० रोजी मा. अति जिल्हा व सत्र न्यायालयात भुसावळ येथे दोषारोपपत्र दाखल केले असून त्याचा स्पेशल केस नं. १४२/२०२० असा आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायाप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-शिळ व मुंब्रा-तळोजा मार्गावर नियम डावलून
अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याबाबत

(४३) १७१४५ (२३-११-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-शिळ व मुंब्रा-तळोजा मार्गावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी असतानाही नियम डावलून अवजड वाहनांची अनधिकृत वाहतूक सुरु असल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार अवजड वाहनांना बंदी असतानाही अवजड वाहनांची वाहतूक सुरु ठेवणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०५-२०२१) : (१), (२) व (३) कल्याण शिळफाटा व मुंब्रा तळोजा मार्गावर अवजड वाहतूकीमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडी संदर्भात मा.विधानसभा सदस्य यांनी दि.२४.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

या परिसरातील रस्ता रुंदीकरण, उड्डाणपुलांचे बांधकाम व वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडी होत आहे. यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवजड वाहतूकीवर वेळेचे निर्बंध घालण्यात आले असून तशी अधिसूचना दि.१०.०९.२०१८ रोजी निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची व्यापक प्रसिध्दी देण्यात येत आहे.

तसेच जड अवजड वाहनांच्या मार्गक्रमणास बंदी असणाऱ्या अधिसूचित वेळेमध्ये सदर वाहने रस्त्यावर आल्यास, त्यांच्या विरुध्द अधिसूचनेचा भंग केल्यासंदर्भात मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम १७७ व १७९ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

त्याअन्वये, दि.०१.०१.२०२० ते दि. ३१.१०.२०२० या कालावधीत २५२१ अवजड वाहनचालकांकडून रू.१२,६०,५००/- इतका दंड आकारण्यात आला आहे. गर्दीच्या वेळेमध्ये जड अवजड वाहने रस्त्यावर मार्गक्रमण करणार नाहीत, याकरिता नमूद अधिसूचनेचे कटाक्षाने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई वगळता राज्यात अन्यत्र बांधकाम क्षेत्राशी संबंधित सर्वसमावेशक अंतिम नियमावली प्रसिद्ध करून लागू करण्याबाबत

(४४) १९९३४ (२१-११-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वगळता राज्यात अन्यत्र बांधकाम क्षेत्राशी संबंधित सर्वसमावेशक विकास नियमावली लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रारूप नियमावली माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्ध करून सूचना व हरकती मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त सूचना व हरकती यांचा विचार करून अंतिम नियमावली अद्यापही प्रसिद्ध करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमावली प्रसिद्ध न झाल्यामुळे त्याचा राज्यातील बांधकाम व्यवसायाच्या क्षेत्रावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोनानंतर अनलॉक कालावधीमध्ये अर्थव्यवस्थेला गती देण्याची आवश्यकता असताना शासनाच्या नियमावली अंतिम करण्याच्या विलंबामुळे बांधकाम व्यवसायावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर अंतिम नियमावली प्रसिद्ध करून लागू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०२१) : (१) होय. हे खरे आहे. सदर प्रारुप नियमावली दि.०९.०३.२०१९ रोजी सूचना/हरकतीसाठी राजपत्रात प्रसिध्द केली होती.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य काही विशिष्ट नियोजन प्राधिकरणे वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, इतर नियोजन प्राधिकरणे तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (Unified DCPR) म.प्रा.नि व न.र अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८ वि.यो व प्रा. यो. /कलम (१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३,

दि.०२/१२/२०२० अन्वये अंतिम मंजूरी देऊन ती दि.०३/१२/२०२० पासून लागू करण्यात आली आहे.

(३) व (४) वरील मुद्दा क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर झाल्यामुळे बांधकाम व्यवसायाच्या क्षेत्रावर परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) वरील मुद्दा क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार शासनाने दि.०२/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून सदर नियमावली दि.०३/१२/२०२० पासून लागू झाली आहे त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) विलंब झालेला नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्यावतीने पिंपरी-चिंचवड व पुणे मधील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या उपाययोजना करण्याबाबत

(४५) २०३४४ (२७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड व पुण्यामधील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करून त्यांना पक्की घरे देण्याकरिता झोपडपट्टी विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती त्यानूसार झोपडपट्टीधारकांना २५ चौरस मीटर (२६९ चौरस फूट) क्षेत्राची विनामूल्य निवासी सदनिका ऐवजी तीनशे चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका द्यावी याबाबतचा प्रस्ताव एस आर ए झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या भूखंडावर चटई निर्देशंकाची कमाल मर्यादा किमान ४ करण्याबाबत प्रस्ताव तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्यावतीने प्रचलित प्रति हेक्टदर ३६० झोपड्यांची घनता वाढून ती ४५० करावी याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून योजना राबविताना इमारतीच्या ४० मीटर उंचीच्या मर्यादेची अट वगळून स्थानिक विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत अनुज्ञेय होणारी उंची मंजूर करणेबाबत तसेच २० टक्के टीडीआर वापरण्याची कमाल मर्यादा वाढवून किमान ३० टक्के टीडीआर वापरण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव तातडीने मंजूर होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, तसेच झोपडपट्टी विकास प्राधिकरणाकडून टीडीआर देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तालुका आयुक्तांना संबंधित विकास हक्क प्रमाणपत्र एक महिन्याच्या विहित कालावधीत वितरीत करण्याबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) च्या वतीने सुचविण्यात आलेल्या नवीन बदलांचा प्रस्ताव मागील एक वर्षापासून शासन स्तरावर मंजुरी अभावी प्रलंबित असून पिंपरी-चिंचवड शहरातील ७१ घोषित व अघोषित झोपडपट्ट्या व पुणे शहरातील पाचशेपेक्षा अधिक

छोट्या-मोठ्या झोपडपट्ट्या विकासाअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नव्या बदलानुसार पाठवलेला प्रस्ताव तात्काळ मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०४-०६-२०२१) : (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ यांचा समावेश असलेला महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ ब नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणेसाठीचे "सर्वसाधारण झोपडपट्टी योजने" बाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) व (६) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमुर्लन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ ब नुसारचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

मावळ (जि.पुणे) तालुक्यातील अनेक जमिनी बनावट कागदपत्राआधारे विक्री झाल्याबाबत.

(४६) २०३४८ (२८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील अनेक जमिनी बनावट कागदपत्राआधारे जमीन मालकाला न कळता परस्पर विकण्याचा उद्योग काही टोळ्यांनी एजंटला हाताशी धरून सुरू केला असून जमिनीची परस्पर बनावट खरेदी खत करण्यामध्ये दुय्यम निबंधक कार्यालयातील काही अधिकारीही एजंटसोबत सहभागी असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच बनावट जमिनी खरेदी-विक्रीचे ३५ गुन्हे दाखल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मावळ तालुक्यातील कुणेनामा- लोणावळा येथील सरकारी व सोशल वेल्फेअर ट्रस्टची सव्वासात कोटी रुपये किमतीची जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे विकण्यात आली असून देवस्थानच्या जमिनी धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय विकता येत नसतानाही काही एजंटनी शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने जमिनी बळकावल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मावळ तालुक्यात मागील दहा वर्षात जमीन खरेदीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात झाले असून परराज्यात किंवा बाहेरगावी राहत असणाऱ्या काही जमिन मालकांनी त्यांच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर दुसऱ्याचे नाव दिसून येत असल्याच्या तक्रारी केल्या आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यातील बेकायदेशीर जमिनीचे व्यवहार करून आर्थिक फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०६-२०२१) : (१) पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील मावळ तालुक्यातील लोणावळा शहर, लोणावळा ग्रामीण, कामशेत व वडगाव मावळ अशा ४ पोलीस स्टेशन मध्ये बनावट कागदपत्राआधारे जमीन खरेदी विक्री केलेबाबत सन २०२० व माहे जानेवारी २०२१ अखेर एकूण ३ गुन्हे दाखल असून त्यामध्ये १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. परंतु त्यामध्ये एजंटची टोळी किंवा दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी/एजंट निष्पन्न झालेले नाहीत.

३ गुन्ह्यापैकी २ गुन्हे तपासावर असून १ गुन्हा न्यायालयात प्रलंबित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी लोणावळा शहर पोलीस स्टेशन गु. र. नं.४३५/२०२० भादंवि कलम ४०६, ४२०, ४२३, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ प्रमाणे दिनांक १६/८/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये कोणीही शासकीय अधिकारी असल्याचे निष्पन्न झाले नाही.

गुन्हा तपासावर आहे.

(३) मागील दहा वर्षामध्ये पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील मावळ तालुक्यातील लोणावळा शहर, लोणावळा ग्रामीण, कामशेत व वडगाव मावळ या पोलीस स्टेशन मध्ये एकूण ५१ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ११५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. २४ गुन्ह्यांचे दोषारोपपत्र मा.न्यायालयामध्ये सादर करण्यात आले असून १ अ - फायनल, १ ब-फायनल व १ क-फायनल अशी निर्गती करण्यात आली असून २४ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(४) तालुक्यातील बेकायदेशीर जमिनीचे व्यवहार करून आर्थिक फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयामध्ये सादर करण्यात आले आहे. जे गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत त्यामधील आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यात सर्व्हरला स्पीड मिळत नसल्याने तलाठी सर्कलने डिजिटल स्वाक्षरी जमा केल्याबाबत.

(४७) २०३५९ (२८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागाने नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन सातबारा, आठ अ उतारे संगणक प्रणालीवर उपलब्ध करून दिले असून सर्व्हरला स्पीड मिळत नसल्याने व बऱ्याच वेळा सर्व्हर डाऊन असल्याने खातेदारांना सातबारा, आठ अ, फेरफार नक्कल वितरित करण्यात तलाठी यांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळ अधिकारी स्तरावर मुदतीत फेरफार नोंदी करता येत नसल्याने मंडळाधिकारी, शेतकरी व खातेदार यांच्यामध्ये रोज वादाचे प्रसंग निर्माण होत असून पुणे

जिल्ह्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांनी वारंवार तहसीलदार व प्रांताधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल विभागाच्या संगणकीय सातबारा योजनेसाठी वापरण्यात येत असलेल्या सर्व्हरला स्पीड मिळत नसल्याने जिल्ह्यातील सर्व तलाठी सर्कलने डिजिटल स्वाक्षरी प्रशासनाकडे २६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास जमा केल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिजिटल स्वाक्षरी जमा केल्यामुळे शेतकऱ्यांच्या महसूल नोंदी करण्यात मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण झाली असल्याने अद्यावत संगणक प्रणाली राबविण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०५-०३-२०२१) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) स्वतंत्र सर्व्हर व जास्त स्पीड असणारा सर्व्हर उपलब्ध करून दिलेला असल्याने सर्व्हरच्या कमी स्पीडमुळे येणाऱ्या तांत्रिक अडचणी दुर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक २७.१०.२०२० रोजी पासनूचे सर्व कामकाज नियमितपणे सुरळीत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

भांबुर्डा, मौजे बावधान, (जि.पुणे) येथे वनक्षेत्रपाल यांनी वनक्षेत्रात सिंहगड घाट रस्ता सह विविध भागामध्ये मोजणी न करता वन हद्दीच्या आत संरक्षक भिंत बांधल्याबाबत

(४८) २७१६८ (०६-०५-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांबुर्डा, मौजे बावधान (जि. पुणे) कार्यालयातील वनक्षेत्रपाल यांनी सिंहगड घाट रस्त्यालगत व विविध भागात वनक्षेत्राची मोजणी न करता वन हद्दीच्या आत संरक्षक भिंत बांधून विकासकाच्या हितासाठी शासनाच्या अटी-शर्तीचा भंग केला असल्याचे माहे फेब्रुवारी-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामधील एका प्रकरणात तत्कालीन वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांच्यावर दोषारोपपत्र बजाविण्यात आले असून या प्रकरणामध्ये विकासकाशी संगनमताने शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे बावधान येथे वनक्षेत्राभोवती राखीव वनांचे संरक्षण करण्याकरिता व अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाकडून १६२२.७१ लक्ष इतक्या प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रक्कमेत सीमाभिंतीच्या कामाची निविदा प्रक्रिया, कंत्राटदारास देयके अदा करण्याच्या प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२१-०६-२०२१) : (१) हे खरे नाही.

तथापि, मौजे बावधन जि.पुणे येथील राखीव वन स.नं. २१ चे क्षेत्राबाबत माहे, २०१७ मध्ये वन विभागामार्फत सर्व्हेक्षण केल्यानंतर ०.३८ हे. राखीव वनक्षेत्र तसेच मौजे वारजे, ता.हवेली येथील राखीव वन स.नं. ९६ मध्ये २.६८ हे. वनक्षेत्र वन हद्दीबाहेर सुटल्याचे ऑगस्ट, २०१८ मध्ये निदर्शनास आले तद्नंतर सदर ठिकाणचे अतिक्रमण निष्कासित करुन सिमाभिंतीबाहेर सुटलेले क्षेत्र ताब्यात घेऊन त्याचे सिमांकन करण्यात आले आहे.

सिंहगड घाट रस्त्यालगत वन हद्दीच्या आत सिमाभिंत बांधण्यात आलेली नाही.

(२) वन क्षेत्रामध्ये झालेले अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही न करणे तसेच शासकीय कामात कर्तव्यपरायणता न ठेवणे या कारणास्तव तत्कालिन वनक्षेत्रपाल भांबुर्डा यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करुन त्या दोषी आढळल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ नुसार त्यांना शिक्षा बजावण्यात आली आहे.

तथापि, प्रकरणी विकासकाच्या हितासाठी/संगनमत करुन शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) हे खरे नाही. सिमाभिंतीबाबत ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून मोजमाप पुस्तिकेनुसार केलेल्या कामाचे कंत्राटदारास देयके अदा केली आहेत, तसेच या कामांचे लेखा परिक्षण झाले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे खडकवासला व शिवापूर (ता.हवेली, जि.पुणे) येथील तलाठी कार्यालयात होत असलेला गैरप्रकार

(४९) २७१७१ (१८-०३-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खडकवासला व शिवापूर (ता.हवेली, जि.पुणे) येथील तलाठी यांच्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा नियमामधील तरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांमधील तलाठी कार्यालयामध्ये ई हक्क प्रणालीचे अर्ज व सरकारी नोंदीची अनेक प्रकरणे प्रलंबित असणे, कर्मचारी नियमितपणे कार्यालयात न येणे, नागरिकांना कमी दर्जाची वागणूक देणे, लोकप्रतिनिधीचे फोन त्वरित न घेणे, हेतुपरस्पर अनेक आवश्यक निर्णय प्रलंबित ठेवणे, सातबारा व फेरफार नोंदी जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, तुकडा बंदी नियमाचे उल्लंघन करणे इत्यादी गैरप्रकार तलाठी यांच्याकडून मागील दीड वर्षात होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मौजे खडकवासला व शिवापूर येथील तलाठी कार्यालयात गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (१६-०६-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) मौजे खडकवासला व शिवापूर (ता. हवेली, जि. पुणे) या गावात ई हक्क प्रणालीमध्ये एकही ऑनलाईन नोंद प्रलंबित नाही.

तुकडेबंदी नियमाचे उल्लघंनाबाबत तहसिलदार, हवेली यांचेकडून दप्तर तपासणी करण्यात येत आहे. सदर तपासणीत तुकडेबंदी नियमाचा भंग झाले असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधिताविरुध्द कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येईल.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सिद्धनाथ वाडगाव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी दोन मधून श्रेणी एक मध्ये दर्जावाढ करण्याबाबत

(५०) २७१७४ (१८-०३-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिद्धनाथ वाडगाव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी दोन मधून श्रेणी एक मध्ये दर्जावाढ करण्याची मागणी शासनाकडे केली जात असुन त्याबाबत पशुसंवर्धन मंत्री यांनी पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांना दिनांक १ जानेवारी २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी दोन मधून श्रेणी एक मध्ये दर्जावाढ करण्याबाबतची कार्यवाही झालेली नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सिद्धनाथ वाडगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणी दोन मधून श्रेणी एक मध्ये दर्जावाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (१८-०६-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी नियोजन विभागाने काही मुद्दे उपस्थित केलेले असून, त्याबाबतची माहिती आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचेकडून मागविण्यात आली असून, माहिती प्राप्त होताच विभागाचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्याचे संकल्पित आहे.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.